An International Peer Reviewed & Referred

INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# लमाणी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणभाषेकडे नेणाऱ्या सेतूकार्यक्रमाची निर्मिती

**वैभव जाधव Ph.D, संजीवनी सांगळे**

प्रस्तुत संशोधन विषय 'लमाण' या भटक्या विमुक्त जमातींशी संबंधित आहे. हा विषय संशोधन कार्यासाठो मुद्दामहून शोधावा लागला नाही तर गेल्या काही वर्षापासून करीत असलेल्या अध्यापन कार्यातून शैक्षणिक क्षेत्रातील स्थगन-गळती, दुर्बल घटकांची शैक्षणिक परिस्थिती यांसारख्या प्रश्नांचे गांभीर्य आणि वास्तवता स्पष्ट झाली. श्री. लक्ष्मण माने यांचे आत्मचरित्र 'उपरा', श्री. लक्ष्मण गायकवाड यांच 'उचल्या' यांसारख्या साहित्याच्या वाचनाने सामाजिक जाणीव अधिक प्रगल्भ झाली. ज्या शाळेत संशोधक अध्यापनाचे काम करते त्या शाळेत शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी हे लमाणी आहेत. पांडू लमाण वस्ती, येरवडा येथे शाळा असल्यामूळे या वस्तीतीलच विद्यार्थी या शाळेत आहेत. गेल्या काही वर्षांपासून संशोधिका या शाळेत शिकवण्याचे काम करते त्यामुळे हे विद्यार्थी ज्या सांस्कृतिक भाषिक वैविध्यांतून येतात त्याची संशोधकाला माहिती आहे. संशोधक या विद्यार्थ्यांना शिकवत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे शिकवत असताना लक्षपूर्वक व एकाग्रतेने ऐकण्याची सवय या विद्यार्थ्यांमध्ये आढळून आली नाही आणि त्यांना कितीही सांगितले आणि पुन्हा पुन्हा विचारले तर काहीही येत नाही. तेव्हा या विद्यार्थ्यांना सांगितलेले लक्षात का राहात नाही किंवा समजत नाही यादृष्टीने विचार करण्यास सुरुवात केली. तेव्हा असे लक्षात आले की, त्यातल्या काहींना बोललेले समजतच नसल्यामुळे त्यांना ऐकाण्यातही रस नव्हता, समजतच नाही म्हटल्यावर आवड तरी कशी निर्माण होणार.

**पार्श्वभूमी :** भारतातील खालचा वर्ग नेहमीच शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षिला गेला आहे. एकूणच सर्व म्हणजे पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक स्तरावरच्या शिक्षणाची अशा विद्यार्थ्यांची आबाळ होत आहे[११]. याच दरम्यान कंजारभाट जमातींतील श्री. जयराज रजपूत यांचे 'पडद्याआड', लक्ष्मण माने यांचे 'विमुक्तायन' ही पुस्तके वाचण्यात आली. 'विमुक्तायन' यामध्ये आदिवासी आणि विमुक्त जमातींची स्थिती, महाराष्टातील विमुक्त जमांतीची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती याविषयी माहिती वाचनात आली आणि तेव्हा या जमातींविषयी त्यांच्या बोलीभाषेविषयी अधिक माहिती मिळाली, तसेच 'अंकुर' या शाळेतही अशा भिन्न भाषिक विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली जात असल्याची माहिती मिळाली. यातूनच भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि जमातीमधील साक्षरता वाढविण्यासाठी ह्या विद्यार्थ्यांना शिकताना नेमक्या कोणत्या अडचणी येतात हे समजून घेण्याच्या उद्देशानेच प्रस्तुतचे संशोधन केले.

**सैध्दान्तिक पार्श्वभूमी :**

लमाणी भाषेचे मूळ नाव 'लम्बाडी' असे असून इतर अनेक नावे आहेत. जसे की, Lamani, Banjuri, Labhani, Banjari, Lamadi, Lambani, Lambara, Lavani, Lemadi, Lumadale, Labhani Muka, Banjara, Bangale, Banjari, Brinjari, Gohar-Herkeri Goola, Gurmarti, Gormati Kora, Singali, Sugali, Sukali Tanda, Vanjari, Wanji.

लमाणी भाषेचा समावेश भटक्या जमातींमध्ये केला जातो. लमाणी भाषा मोठ्या प्रमाणावर ओरिसा राज्यात बोलली जाते. तसेच महाराष्ट, कर्नाटका, आंध्रप्रदेश या ठिकाणी लमाणी भाषा बोलली जाते. लमाणी भाषा बोलणाऱ्यांची संख्या 1,961,000 इतकी आहे. लमाणी मूळ भाषेची निर्मिती इंडो-आर्यन कुटुंबापासून झाली आहे. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना इयत्ता पहिलीच्या वर्गाला शिकवताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. इयत्ता पहिलीच्या वर्गात नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय वातावरण हे अगदीच नवे असते. अशा परिस्थितीत जर त्यांच्या घरी बोलली जाणारी भाषा ही शाळेत बोलल्या जाणाऱ्या भाषेपेक्षा वेगळी असेल तर ह्या नाविन्यात आणखीनच भर पडते. ज्याद्वारे विद्यार्थी स्वत:ला अभिव्यक्त करु शकतो अशा अभिव्यक्तीला संधीच मिळाली नाही तर त्याचा आत्मविश्वास कमी होऊन त्याची अभिरुची कमी होते.

या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यातून त्यांना योग्य मार्ग दाखवला नाही तर ही मुले शिक्षणापासून वंचित राहतील, तसेच ही मुले पुढे न शिकता परंपरेने चालत आलेले त्यांचेच व्यवसाय करतील जे समाजविघातक आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागेल आणि ते याच दुष्टचक्रात फिरत राहतील. ही मुले शाळेत आली पाहिजेत, त्यांना शिक्षणाची गोडी निर्माण होऊन ती शिकली पाहिजेत व ती टिकली पाहिजेत आणि त्यांच्या शिक्षणात शिक्षणाचे माध्यम भाषा हा मूळ अडथळा असेल तसेच संवादाची भाषा ही परस्परांतील अडथळा ठरत असेल तर घरची भाषा आणि शाळेतील भाषा यांच्यातील दरी मिटवण्यासाठी त्यांच्यामध्ये दुवा निर्माण होणारा कार्यक्रम तयार करण्याची गरज आहे यादृष्टीने हे संशोधन करणे गरजेचे आहे. तसेच Article 350 A मध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण द्यावे, त्यासाठी लागणारी पाठ्यपुस्तके (प्राथमिक व माध्यमिक स्तरावर) केंद्र सरकारने काढावीत आणि त्याच्या जबाबदारी राज्य सरकारन घ्यावी.

**सेतूकार्यक्रमासाठी सैध्दान्तिक पार्श्वभूमी :**

संशोधकाला पहिलीच्या वर्गातील मुलांची मातृभाषा लमाणी असल्यामुळे प्रमाण भाषेतून शिकवण्यात अडथळे येतात. हे लक्षात आल्यावर त्यासाठी लमाणी भाषेकडून प्रमाण मराठीकडे नेणारा 'सेतूकार्यक्रम' तयार केल्यास आणि राबविल्यास ते उपयुक्त ठरेल असे संशोधकाला वाटते, मात्र अशा प्रकारचे सेतूकार्यक्रम करण्यासाठी शिक्षणशास्त्र किंवा मानसशास्त्र याला काही पुष्टी देत आहे का? त्याचा शोध घेतला तेव्हा खालील बाबी पुढे आल्या.

**अ) शैक्षणिकदृष्ट्या :**

**१) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम अधिनियम 2009 नुसार :**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा शोध घेऊन, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे बालकांचा मोफत व सक्तीचा

प्राथमिक शिक्षण अधिनियम 2009 (आर.टी.इ. ॲक्ट 2009) कायद्यानेसुद्धा हा विचार केला आहे आणि 24(1) कलम 23, पोटकलम (1) अन्वये शिक्षकांनी पुढील कर्तव्ये पार पाडावीत.

1 **प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन करणे आणि त्यानुसार कोणतीही आवश्यकता भासल्यास अतिरिक्त पूरक शिक्षण देणे.(पृष्ठ क्र, 17, 24(घ))**

2 **शक्य असेल तेथवर शिक्षणाचे माध्यम हे बालकाची मातृभाषा असणे. (पृष्ठ क्र. 18-29(च))**

3 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 मध्ये सूचित केल्यानुसार 7 मार्च 2012 च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे या संस्थेस विद्याविषयक प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले.

या प्राधिकरणाकडे अभ्यासक्रम व मूल्यमापन पध्दती निश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. (प्रा.शि.अ.2012, इ. 1 ली व 2 री, पृ. क्र. 20) यामध्येही मुलाला मातृभाषेतून शिक्षण देणे असे नमूद केले आहे.

4 इयत्ता 1 ली व 2 री साठीच्या 2012 च्या अभ्यासक्रमामध्ये शालेय शिक्षणाच्या साधारण उद्दिष्टांमध्येही विद्यार्थ्यांचे घर, परिसर व समाज यातील अनुभव आणि शाळेतील सहेतुक अनुभव यांची सांधेजोड करणे हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

5 भाषा ग्रहणाची टप्प्याटप्प्याने विकसित होणारी जी क्षेत्रे आहेत, त्यापैकी

**पहिले क्षेत्र** - घरातील आणि परिसरातील भाषिक आंतरक्रिया.

**दुसरे क्षेत्र** - वर्ग, शाळा आणि समाज येथे होणाऱ्या भाषिक आंतरक्रिया.

मूल शाळेत येते तेव्हा त्याला पहिल्या क्षेत्रातील अनौपचारिक भाषिक क्रियांकडून दुसऱ्या क्षेत्रातील औपचारिक भाषिक क्रियांकड जावे लागते आणि तेव्हा या दोन भाषांमधील दोन तफावतींसाठी सांधे जोड करणे आवश्यक ठरते. (शिक्षण प्रशिक्षण मार्गदर्शिका मराठी इयत्ता 1 ली व 2 री, पृ. क्रं. 16 सन 13-14)

**2) या संबंधी सर्व शिक्षा मिशन बर्धमान येथे झालेल्या संशोधनाचा आधार :**

Research and Evaluation Cell District Project Office Serva Shikshan Mission, Bardhaman या ठिकाणी सर्व शिक्षा मिशन अंतर्गत शैक्षणिक समस्या लक्षात घेवून, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सेतूकार्यक्रमाची निर्मिती केली जाते.

येथे अशा प्रकारच्या उपक्रमांचे प्राथमिक स्तरावर 105 केंद्रे असून उच्च प्राथमिक स्तरावरील 400 निर्मितीकेंद्रे आहेत अशी एकूण 605 निर्मितीकेंद्रे आहेत. यामध्ये प्रामुख्याने 60 केंद्रांवर सर्व्हे केला असता या कार्यक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांची संख्या 1432 दिसून आली. त्यापैकी 606 प्राथमिक स्तरावरील (1 ली ते 4 थी पर्यंत) व 826 (5 वी) पर्यंतची आणि हे सर्व (1 ली ते 5 वी पर्यंत) शाळा सोडलेले व कधीही शाळेत न गेलेले विद्यार्थी आहेत. जास्त प्रमाण हे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये आढळून आले.

अशा प्रकारच्या सेतूकार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. व त्यांच्यामध्ये अपेक्षित बदल दिसन् आला.

1) या सेतूकार्यक्रमांमुळे मुले मोठ्या प्रमाणात शिक्षणाकडे आकर्षित झाल्याचे दिसून आले आणि त्यांनी शिक्षण पूर्ण करण्याचे ठरविले.

2) जी मुले कधीही शाळेत गेली नव्हती अशी मुले या कार्यक्रमाला नियमितपणे येऊ लागली. वाचन, संभाषण, गणिते सोडविणे या गोष्टी करु लागले.

3) वेळेचे लवचिक धोरण असल्यामुळे शिक्षण आणि काम या दोन्ही गोष्टी करणे त्यांना शक्य झाले.

4) जी मुले शिक्षणापासून वंचित आहेत अशा मुलांना शाळेच्या प्रवाहात आणणे एवढेच साध्य झाले नाही तर या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीची उत्सुकता व उत्साह निर्माण झाला.

5) शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये जी जवळीक निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड व ओढ निर्माण झाली. व ही जवळीक साधण्याचे महत्त्वाचे काम सेतूकार्यक्रमांमुळे झाले. या कार्यक्रमाचे श्रेय अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. राजश्री मुजुमदार यांचे आहे.

सदर संशोधनात, विद्यार्थ्यांची गळती व स्थगनाच्या वेगवेगळ्या कारणांचा शोध घेऊन त्यावर सेतूकार्यक्रम राबविला आहे. सदर संशोधन प्रस्तुत संशोधनासाठी, भाषेमुळे शिक्षणात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी करावयाच्या सेतूकार्यक्रम निर्मितीसाठी सहाय्यक ठरते.

वरील सर्व संदर्भ हे प्रस्तुत सेतूकार्यक्रमासाठी आधारभूत असून, इयत्ता पहिलीतील लमाणी विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी सोडविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सेतूकार्यक्रमासाठी उपयुक्त ठरतात.

**ब) मानसशास्त्रीयदृष्ट्या :**

ज्या ज्ञानसंरचनावादावर आधारित प्राथमिक शिक्षण नवीन अभ्यासक्रम आहे. त्या ज्ञानरचनावादाचे पुरस्कर्ते 'जेरोम ब्रूनर' असे म्हणतात. ''मुलांच्या अनुभवांशी नाते असणारे अध्ययन असेल तर मुले शिकायला तयार असतात.'' तसेच लेव वायगॉटस्की यांच्या म्हणण्यानुसार ''मुलांच्या विकासात त्यांची भाषा आणि विचार प्रक्रिया यांचा मोठा वाटा असतो.''

या दोन्हींचा विचार करता असे म्हणता येते की, मुलांचे शाळेत येण्यापूर्वीचे भाषिक अनुभव आणि शाळेतील भाषिक अनुभव यांच्यातील तफावत मुलांच्या विकासावर परिणामकारक ठरते हे भरुन काढण्याचे काम सेतूकार्यक्रमाद्वारे होऊ शकते. (संदर्भ : 'मैत्री ज्ञानसंरचनावादाशी', लेखक : डॉ. वसंत देशपांडे, डॉ. सुमन करंदीकर)

**सेतूकार्यक्रम निर्मिती :**

लमाणी मातृभाषा असलेले विद्यार्थी इयत्ता पहिलीच्या मराठीच्या ज्या ज्या भाषिक क्षमतांमध्ये कमी आहेत त्याची प्रथम माहिती घेतली जाईल. तसेच लमाणी भाषेतील शब्दांचा कोश तयार केला जाईल. लमाणी भाषेतोल शब्द व मराठीतील इयत्ता पहिलीला वापरले जाणारे शब्द यांच्यातील संबंध लक्षात आणून देणारे अध्ययन अनुभव दिले जातील. लमाणी भाषेतील शब्दांचा कमी कमी वापर करत जावून मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी विद्यार्थी प्रवृत्त होतील अशा अध्ययन अनुभवाची योजना केली जाईल. हे अध्ययन अनुभव देताना विद्यार्थ्यांचा परिसर व त्यांचे अनुभवविश्व यांचा विचार केला जाईल.

# सेतूकार्यक्रम व सैध्दांतिक आधार :

प्रस्तुत संशोधनात लमाणी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणभाषेकडे नेणाऱ्या सेतूकार्यक्रमाची निर्मिती व त्याची परिणामकारकता अभ्यासणे हा उद्देश साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या सिध्दान्ताचा अभ्यास करुन त्याचे योग्य प्रकारे आकलन होण्यासाठी त्याचे विश्लेषण केले व ते पुढील मुद्यांना अनुसरुन मांडले आहे.

| सेतू कार्यक्रम टप्पे | घटक | उपक्रम/कृती | सैध्दांतिक आधार |
|---|---|---|---|
| **प्रमाण मराठीच्या** शब्दसंपत्तीत वाढ करणे | 1) शब्द : लमाणी शब्द - चित्र - मराठी प्रतिशब्द<br>2) नेहमीच्या वापरातील मराठी शब्द व त्यांचे लमाणी शब्द<br>3) लमाणी वाक्य व त्याचे मराठी वाक्य | **1) शब्द निवड** (चित्र व शब्द)<br>वाघ, वानर, गाय, मांजर, मासा, झरा, छान छान, मामा आला.<br>वरील सर्व शब्दांना लमाणी भाषेत काय म्हणतात? या विषयीची शब्दकार्ड<br>**शब्दांची यांदी :**<br>10 - प्रमाण मराठीतील शब्द व त्यांचेच<br>10 - लमाणी भाषेतील शब्द देऊन लमाणी भाषेतील शब्दासाठी प्रमाण मराठीतील शब्द सांगणे.<br>**2) भिडू शोधणे :**<br>10 मुलांचा एक याप्रमाणे दोन गट करुन प्रत्येक मुलाच्या हातात पाटी देऊन त्यावर पहिल्या गटातील 10 मुलांच्या पाटीवर मराठी शब्द लिहून दुसऱ्या दहा मुलांच्या पाटीवर त्याच शब्दांसाठी लमाणी शब्द लिहून खेळ समजावून सांगणे.<br>**3) शब्दांच्या भेंड्या :** दोन गट करुन<br>1) गट 1 - चित्र व लमाणी शब्द सांगेल.<br>2) गट 2 - लमाणी शब्दाला प्रमाण मराठी शब्द सांगेल.<br>**4) शब्दपूर्ती :** चित्र व चित्रासंबधीच्या शब्दाचे सुरुवातीचे अक्षर देऊन उरलेल्या अक्षरांची जागा रिकामी सोडणे. यासाठी | 1) भाषेचा वापर करण्यासाठी त्या भाषेतील शब्दसंग्रह ही पूर्वावश्यक बाब आहे. विविध परिस्थितीत कोणते शब्द वापरले जातात याचे वैविध्यपूर्ण अनुभव शब्द संपत्तीत भर टाकायला मदत करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनेक कार्डस् तयार करणे.<br>उदा. (सरसर, धूम, भिंगरी, भाजी, भाकरी, गाठले घर)<br>1) पाऊस पडतो, **सर** .....<br>2) धावा धावा, **ठो** ... **ध्**..<br>3) धावता, धावता **गा** ....<br>4) एक होती **भिं**.......<br>5) ताटात घेतली **भा... भा**..<br>(वरील सर्व कार्डस् लमाणी भाषेतही असतील.)<br>**5) शब्दकोडे :** चित्र दाखवून रिकामे चौकोन देऊन माहिती पूर्ण करा.<br>खालील चित्रांचे कार्ड, शब्दांचे कार्ड (चौदा, चौरस, चौकोन, चौघडा)<br>**6) पार्सिंग कार्ड :** कार्डावर प्रमाण मराठो शब्द व चित्र देऊन पुढे पास करुन लमाणी शब्द विचारणे. बरोबर सांगता आल्यास, त्या गटाला गुण.<br>नाहीतर शब्द पुन्हा त्या गटाकडे पाठविणे. लमाणी शब्द व चित्र दाखवून प्रमाण मराठी शब्द विचारणे.<br>**7) जोड्या लावा :** लमाणी वाक्य व मराठी वाक्य<br>**लमाणी वाक्य :** खारवना सईबाई खुदूकन हसो.<br>**मराठी वाक्य :** खाताना सईबाई खुदकन हसे.<br>त्याचप्रमाणे **पत्ते खेळणे, बजर राऊण्ड** यासारखे खेळ घेता येतील. | |
| **प्रमाण मराठीच्या आकलनात वाढ** | **वृत्तपत्रे वाचन** सोप्या मराठीतील गोष्टींची पुस्तके, सूचनांप्रमाणे कृती करणे, कविता, सीडी. | **1) वृत्तपत्रे वाचन :** बालमित्रमधील शब्दकोडी चित्रात दाखवलेल्या प्राण्यांच्या योग्य जोड्या लावा व त्यांची नावे सांगा.<br>**2) गोष्ट सांगणे :** चित्राच्या आधारे छोटी छोटी वाक्ये सांगून प्रमाण मराठीतून गोष्ट सांगणे व | 1) व्यवहारात होणाऱ्या भाषेच्या वापराचे विविध |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तिच गोष्ट लमाणी भाषेत सांगणे.<br>**3) कविता सादरीकरण :** ढोंड ढोंड पानी दे, साय-माय पिकू दे ।<br>पंडायमां कवडी, यरं पानी दौडी.<br>ढोंड ढोंड पानी दे, साय-माय पिकू दे।<br>किसन गया खेतमां, पानी वूना रातमां.<br>ढोंड ढोंड पानी दे, साय-माय पिकू दे।<br>आदिवासी भिलोरी बोली भाषेमध्ये ढ ढोंड ढोंड पानी दे असेही म्हणतात. आदिवासी बोली भाषेतील शब्दांचे अर्थ.<br>पानी-पाऊस-पाणी, साय-साळी, पंडाय-पन्हळ, यरं-येरे, वूना-आला. (कृती व अभिनयासह म्हणून दाखवणे व लमाणी भाषेतील गाणे म्हणून दाखवणे)<br>(संदर्भ : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४. इयत्ता १ली)<br>**4) चित्रात दाखवल्याप्रमाणे कृती करा.**<br>डोलणे, हसणे, पळणे, नाचणे, गारा वेचणे, धावणे, जेवणे.<br>**5) सी.डी.:** प्रमाण मराठी शब्द व लमाणी शब्द ऐकवणे.<br>प्रमाण मराठी वाक्य व लमाणी वाक्य ऐकवणे.<br>प्रमाण मराठी कविता व लमाणी कविता ऐकवणे. | अनुभव भाषेचे आकलन वाढण्यास उपयुक्त ठरतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रमाण मराठीच्या अभिव्यक्तीत वाढ** | स्वत:चा परिचय, स्वत:च्या परिसराबद्दल माहिती, एखादा छोटासा अनुभव | **1) स्पर्धा घेणे :** पुढील विषय देऊन पाच मिनिटे प्रमाण मराठी भाषेतून व लमाणी भाषेतून बोलण्यास सांगणे.<br>1) स्वत:ची माहिती, स्वत:चा परिचय आणि २) परिसराची माहिती<br>**2) नाट्यीकरण :** प्रसंग निर्माण करणे व चर्चा करणे.<br>मांजराची गंमत : चित्र दाखवून चित्राचे निरीक्षण करण्यास सांगणे. नंतर चित्रावर आधारित प्रश्न विचारुन, चित्रासंबंधी बोलण्यास प्रवृत्त करणे.<br>1) दुध घेण्यासाठी कोण आले?<br>2) मांजराने कोणाला पाहिले?<br>3) उंदराला पाहून मांजराने काय केले?<br>4) शेवटो उंदराने डोक्याला हात का लावला?<br>(वरील सर्व प्रश्न लमाणी भाषेत भाषांतर करुन विचारले) | 1) शब्द संपत्ती, भाषेचे आकलन आणि पूर्वानुभव यांच्यावर भाषिक अभिव्यक्ती अवलंबून असते. दैनंदिन जीवनाशी तसेच वारंवार घेतलेल्या अनुभवांशी निगडीत बाबींची अभिव्यक्ती सहजपणे होते. |

# चर्चा :-

1 काही भिल्ल विद्यार्थ्यांना मराठीतून शिकलेले समजणे अवघड जाते. यासाठी वेळोवेळी ज्या शिक्षकांना भिल्ल बोली भाषा येते, त्यातून समजावण्याचा प्रयत्न केला जातो.हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

2 आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणातील अडचणींची समस्या भाषा ही आहे. प्रस्तृत संशोधनातही भाषा हेच शिक्षणातील अडचणींची समस्या आहे. हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

3 महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती आणि साहित्य - डॉ. ना. धो. कदम (२००७) प्रस्तुत संशोधन करताना श्री. ना. धो. कदम यांनी संपूर्ण महाराष्टात जाऊन त्या लोकांमध्ये प्रत्यक्ष राहून माहिती गोळा केली. त्यांच्या शिक्षणातील अडचणींची समस्या भाषा ही आहे. प्रस्तुत संशोधनातही भाषा हिच शिक्षणातील अडचणींची समस्या आहे. हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

4 कंजारभाट समाजाचे लोक शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. माझ्या सशोधनातही लमाणी लोक शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. हीच समस्या आहे. हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

5 बहुतेक बंजारा हे ५ ते १० रूपये रोजंदारीवर शेतात काम करतात आणि हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. मुले सामाजिकदृष्ट्या अत्यंत गरीब आहेत, तसेच कौटुंबिक वातावरणांचा स्तर अगदी खालच्या पातळीवरचा आहे. अडाणीपणा, निरक्षरता, अंधश्रद्धा, निष्काळजीपणा या सर्व गोष्टी त्यांच्या दुर्दशेत आणखी भर टाकतात. माझ्या संशोधनातही मुले सामाजिकदृष्ट्या गरीब, कौटुंबिक वातावरणाचा स्तर अगदी खालच्या पातळीवरचा आहे. अडाणीपणा, निष्काळजीपणा या सर्व गोष्टी माझ्या संशोधनातही आहे त्यामुळे हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

6 बहुमाध्यम अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना वेगळ्या पद्धतीने शिकण्यात उत्सुकता दिसून येते. माझ्या संशोधनातही भाषेतील समस्या दूर करण्यासाठी अशाच प्रकारच्या सेतूकार्यक्रमाची निर्मिती केली आहे. हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

7 बहुतेक साओरांना उडिया भाषा कळत नसल्यामुळे उडिया अध्ययनामुळे त्यांचा शैक्षणिक दर्जा फारच निम्न राहिला आहे. माझ्या संशोधनातही लमाणी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाण मराठी भाषा कळत नाही. त्यामुळे त्यांचा शैक्षणिक दर्जा फारच निम्न राहिला आहे त्यामुळे हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

8 बोलीभाषेच्या प्रभावामुळे मराठी विषयाच्या वाचनात अनेक अडचणी निर्माण होतात. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रमाणभाषा वाचनाचा अधिक सराव करून घ्यावा. माझ्या संशोधनातही बोलीभाषेच्या

प्रभावामुळे मराठी विषयाच्या वाचनात अनेक अडचणी निर्माण होतात हीच समस्या असल्यामुळे हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

9 भावनिक परिपक्वता विकसन कार्यक्रमाचा छात्राध्यापकांचा शैक्षणिक संपादनावर धन परिणाम झाल्याचे दिसून आले आहे तसेच माझ्या संशोधनातही सेतूकार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर धन परिणाम झाल्याचे दिसून आले. त्यामुळे हा निष्कर्षही माझ्या संशोधनाशी मिळता जुळता आहे.

10 Bringing Language to life Quest's Theatre Bridge Enhances Learning in Class. Theatre-Bridge applies the principles and Strategies of visual theatre to classroom instruction by applying visual theatre modalities and strategies. It creats a learning environment that is for morefully accessible to deaf students, consequently laying a foundation for success in school.

11 Farther, Faster : Six Promising Programmes : The bridge help lower skilled students more farther and faster along college and career paths through dual enrollment in linked basic skills.

12 Providing a Bridge to Intercultural Pedagogy for Native Speaker Teachers of Chinese in Australia : Intercultural approach, integrating critical cultural reflection within language learning. Due to the diversity of background however different groups of teachers need to make sense of this new pedagogy using their own particular cultural lens.

वरील सर्व निष्कर्ष हे माझ्या संशोधनाशी मिळते जुळते आहे.

## संदर्भ सूची

कदम (डॉ.) नागनाथ धों., (1985), 'महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य', प्रथम आवृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

कुंडले, म. बा. (1977) ''शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र'' पुणे-03, श्री विद्या प्रकाशन.

कुलकर्णी, श. रा. अनुवादक, ''उपेक्षितांचे शिक्षण'' पुणे, साधना प्रकाशन.

केनेडी, (इन्स्पे. जनरल ऑफ पोलिस), एम. अनुवाद ह्व आत्रे त्रिंबक नारायण, (1990), 'गुन्हेगारी जाती', दुसरी आवृत्ती, वरदा बुक्स, पुणे.

कृष्णकुमार, भाषांतर गणेश विसपुते, ''शासन, समाज आणि शिक्षण'', पहिली आवृत्ती, फ़ब्रुवारी 2007.

गंदेवार, एस. एन., 'भारतीय सामाजिक समस्या', विद्याभारती प्रकाश, लातूर.

जोशी (तर्कतीर्थ) लक्ष्मणशास्त्री, (1985), 'मराठी विश्वकोश', खंड 12, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

दुनाखे, अरविंद व देशपांडे लिना (1997) ''शिक्षणाचे समाजशास्त्र-एक रुपरेषा'' पुणे नूतन प्रकाशन.

नागपूरे, वि. रा. (1987) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-1986, शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे, पुणे प्रकाशन, संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

पंडित, बन्सिबिहारी, ''शिक्षणातील संशोधन'', नूतन प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, सप्टेंबर 1997.

बनकर, बी. एम. (2004) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण (व्दितीय आवृत्ती) नाशिक : सुहास प्रकाशन.

भिंताड, वि. रा.,''शैक्षणिक संशोधन पध्दती'',नूतन प्रकाशन,पुणे,प्रथम आवृत्ती 1989

माने लक्ष्मण, (1997), 'विमुक्तायन', प्रथम आवृत्ती, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

माने, लक्ष्मण, ''उपरा'', ग्रंथाली प्रकाशन, पहिली आवृत्ती 25 डिसेंबर 1980.

मालशे, मिलींद स., (फ़ब्रुवारी 1995), 'आधुनिक भाषाविज्ञान : सिध्दान्त आणि उपयोजन', न्यू एज प्रिंटींग प्रेस, मुंबई.

मुळे, रा. श. आणि उमाठे वि. तु., ''शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे'', नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, दुसरी आवृत्ती 1987.

रजपूत जयराज, (1991), 'पडद्याआड', प्रथम आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

शेटकर, शेवतेकर, आणि जोशी (2003) भारतीय शिक्षणाचा इतिहास औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, ''बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009'', पृ. क्र. 17, 24 अ (च) आणि 29.

वॉर्नर, सिल्व्हिया ॲश्टन (2000) टीचर

समानतेसाठी शिक्षण (2008)- जीवन शिक्षण प्रकाशन.

Best, J., "Research in Education", New Delhi, Prentice Hall of India 1978.

Best, J., & Khan J., "Research in Education", New Delhi, Prentice Hall of India 1987.

Best J. W. (2006) Research in Education : Prentice Hall of India Pvt. Ltd. New Delhi.

Buch M. B. (1987) Fourth Survey of Research in Education. 1983-88, Baroda New Delhi : National. Council of Educational Research and Training.

Buch, M. B., "Fourth Survey of Researcg in Education", Barodam M. S. University 1991.

Chitnis Suma (1972) Education for Equality case of S.C. in Higher Education (i) From Economic and (ii) Political Weekly. A Sameeksha Trust Publication Bombay 38.

Journal of All India Association for Educational Research.

Richard M. Restak, "The Mind", (1988), Bantam Books, New York.

**वेबसाईट :**

http://www.ed.gov/print/parents/earbychild/ready/preschool/art.html

http://www.ed.gov/tearcher/how/early/cognitvedevsummit01

http://www.kidsource.com/kidsowrle/contents/growth.chart